# महाराष्ट्र राज्यातील पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रमाची प्रगती: एक अभ्यास

**प्रा. डॉ. राजपंगे एम.जी.**
भूगोल विभागप्रमुख,
आनंदराव धोंडे महाविद्यालय,
कडा, ता. आष्ट्री, जि. बीड

**प्रस्तावना:**

महाराष्ट्र शासनाने पाणलोट क्षेत्र विकासाचे तत्व मान्य करुन जमीन आणि पाणी व्यवस्थापनासाठी आवश्यक असलेल्या सुधारणा पाणलोट क्षेत्राअंतर्गत शेतकऱ्यांना करुन देण्याचा निर्णय घेतला आहे. महाराष्ट्रात भविष्यकाळात ३० टक्के क्षेत्र सिंचनासाठी आणण्याचा प्रयत्न महाराष्ट्र शासनाकडून केला जात आहे. प्रस्तुत प्रकरणात महाराष्ट्र शासनाने पाणलोट विषयक ज्या विविध योजना राबविलेल्या आहेत. त्याचा सविस्तर व विश्लेषणात्मक अभ्यास करण्यात आलेला आहे. महाराष्ट्र पाणलोट विकास कार्यक्रम राज्याच्या निर्मितीनंतर शासनाने राज्याच्या विकासासाठी कृषी विषयक विविध योजना राबवल्या आहेत. त्यापैकी पाणलोट विकास कार्यक्रम ही एक महत्वपूर्ण योजना आहे. राज्याच्या सिंचन क्षमतेचा विचार करता राज्यातील बहुतांशी शेती पर्जन्यधारीत असल्यामुळे शेतीसाठी संरक्षीत जलसिंचनाची साधने निर्माण करणे, जमिनीची होणारी धूप थांबविणे, पडित जमिनीचा वापर करुन ग्रामीण भागातील उत्पन्नाची साधने वाढविणे यासाठी जलसंधारणाचा कार्यक्रम राज्यात अनेक योजनाद्वारे राबविण्यात येत आहे.

**एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रमाची प्रगती (सन २००८-०९ ते २०११-१२)**

सन २००८-०९ ते २०११-१२ पर्यंत महाराष्ट्र राज्यात एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रमातंर्गत राज्यात केलेल्या कामाचा तपशील ज्यात राज्यातील जिल्हा निहाय प्रकल्पांची संख्या, पाणलोटाची संख्या, उपचारासाठीचे प्रस्तावीत क्षेत्र आणि प्रकल्पावरील खर्च, तक्ता क्र.१ मध्ये दर्शविण्यात आलेला आहे.


तक्ता क्र.१

**एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन अंतर्गत राज्यातील जिल्हानिहाय पाणलोट क्षेत्र कार्यक्रमाची प्रगती (सन २०१२ पर्यंत)**

| अ.क्र. | जिल्हा | एकूण प्रकल्प संख्या | एकूण सूक्ष्म पाणलोट संख्या | एकूण उपचारासाठीचे प्रस्तावित क्षेत्र | एकूण प्रकल्प खर्च (रु.लाखात) |
|---|---|---|---|---|---|
| १ | ठाणे | १४ | १०८ | ५९४०६ | ७१२८.७८ (१.५९) |
| २ | रायगड | २१ | २०९ | ७१९३० | १०७८९.५ (२.४१) |
| ३ | रत्नागिरी | ४६ | ६०६ | १९०१५२ | २७९०८ (६.२३) |
| ४ | सिंधुदूर्ग | १८ | १५३ | ७७४५० | ११६७७.५२ (२.६१) |
| ५ | नाशिक | २२ | २९२ | ९०१३१ | १३१५१९.६५ (३.०२) |
| ६ | धुळे | २२ | २०१ | ८५९१४ | १०३०९.७ (२.३०) |
| ७ | नंदुरबार | १८ | १९४ | ७६५३४ | ९१८४.०२ (२.०५) |
| ८ | जळगाव | ३१ | २०२ | १२६४४८ | १५१७३.७२ (३.३९) |
| ९ | अहमदनगर | १५ | १७७ | ६५४३४ | ७४५२.०३ (१.६६) |
| १० | पुणे | २९ | ४४३ | १३५१०४ | १८७५३.३ (४.१९) |
| ११ | सोलापूर | ४२ | ६८२ | ८७६२०९ | २३७१४.१ (५.३०) |
| १२ | सातारा | ६४ | ६४३ | २५६८१८ | ३४२०२.१६ (७.६४) |
| १३ | सांगली | २८ | ४८१ | ११९७३४ | १४३६८.१२ (३.२१) |
| १४ | कोल्हापूर | ३४ | ४३४ | १४००९८ | २१०१४.७५ (४.६९) |
| १५ | औरंगाबाद | २१ | ३७४ | ११०३२४ | १३१३८.९३ (२.९३) |
| १६ | जालना | २८ | २०३ | १२८०६८ | १५३६८.२१ (३.४३) |
| १७ | बीड | ५४ | ६५९ | २३१०३० | २७७२३.६७ (६.१९) |

| अ.क्र. | जिल्हा | एकूण प्रकल्प संख्या | एकूण सूक्ष्म पाणलोट संख्या | एकूण उपचारासाठीचे प्रस्तावित क्षेत्र | एकूण प्रकल्प खर्च (रु.लाखात) |
|---|---|---|---|---|---|
| १८ | लातूर | २७ | २८५ | १०७१३२ | १२८५५.९७ (२.८७) |
| १९ | उस्मानाबाद | ३८ | ४१६ | १६८५५२ | २०२२६.२६ (४.५२) |
| २० | नांदेड | ४९ | ५२९ | २१९७०७ | २६३६४.८५ (५.८९) |
| २१ | परभणी | २२ | १९२ | ८५९३९ | १०३१२.७१ (२.३०) |
| २२ | हिंगोली | २९ | ३६० | १२६२८५ | १५१५५.३४ (३.३८) |
| २३ | बुलढाणा | ३५ | ४८३ | १४९९८४ | १७९९८.१२ (४.०२) |
| २४ | अकोला | १२ | ११९ | ५२०५४ | ६२४६.३८ (१.३९) |
| २५ | वाशिम | ०६ | ७६ | २८३४८ | ३४०१.८२ (०.०७) |
| २६ | अमरावती | २६ | ३८३ | ११४०१० | १८९२१.५१ (४.२३) |
| २७ | यवतमाळ | १३ | २०६ | ६४७७१ | ६४६३.१७ (१.४४) |
| २८ | वर्धा | ११ | २२६ | ४६३४७ | ५५६१.६९ (१.२४) |
| २९ | नागपूर | २२ | २६६ | ९०२७३ | १०८३२.७६ (२.४२) |
| ३० | भंडारा | ०९ | १७८ | ४३८२७ | ५२५९.२७ (१.१७) |
| ३१ | गोंदिया | ०८ | २११ | ३४७०९ | ४१६५.०३ (०.९३) |
| ३२ | चंद्रपूर | १० | २१६ | ३७०५२ | ४४४६.२२ (०.९९) |
| | **एकुण** | **८२८** | **१०४१५** | **४२०९७७४** | **४४७३०१.३४ (१००)** |

स्त्रोत : मृदासंधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन विभागाची टिप्पणी महाराष्ट्र शासन फेब्रुवारी २०१२
टिप : कंसातील आकडे एकूणाशी टक्केवारी दर्शवितात.


एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन अंतर्गत राज्यातील जिल्हानिहाय सूक्ष्म पाणलोट संख्या
(सन २०१२ पर्यंत)
संख्या
जिल्हा

तक्ता क्र. १ मध्ये महाराष्ट्र राज्यातील एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रमाची प्रगती दर्शविलेली आहे. त्यामध्ये जिल्हानिहाय एकूण प्रकल्पसंख्या, एकूण सुक्ष्म पाणलोट संख्या, एकूण उपचारासाठीचे प्रस्तावीत क्षेत्र आणि एकूण प्रकल्प मुल्य (लाखात) दर्शविलेले आहे.

तक्त्यामध्ये दर्शविल्याप्रमाणे राज्यात एकूण प्रकल्पाची संख्या ८२८ आहे. त्यामध्ये सर्वात जास्त सातारा जिल्ह्याची ६४ एवढी आहे. तर सर्वात कमी वाशिम जिल्ह्याची ०६ एवढी आहे. तर ठाणे, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, नाशिक, धुळे, नंदुरबार, जळगाव, अहमदनगर, पुणे, सोलापूर, सांगली, कोल्हापूर, औरंगाबाद, जालना, बीड, लातूर, उस्मानाबाद, नांदेड, परभणी, हिंगोली, बुलढाणा, अकोला, अमरावती, यवतमाळ, वर्धा, नागपूर, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर या जिल्ह्यात अनुक्रमे १४, २१, ४६, १८, २२, २२, २२, १८, ३१, १५, २९, ४२, २८, ३४, २१, २८, ५४, २७, ३८, ४९, २२, २९, ३५, १२, २६, १३, ११, २२, ०९, ०८, १० एवढे आहे.

राज्यात सुक्ष्म पाणलोटाची संख्या १०४१५ आहे. त्यामध्ये सर्वात जास्त सोलापूर ६८२ तर सर्वात कमी वाशिम ७६ एवढी आहे. तर ठाणे १०८, रायगड २०९, रत्नागिरी ६०६, सिंधुदुर्ग १५३, नाशिक २९२, धुळे २०१, नंदुरबार १९४, जळगाव २०२, अहमदनगर १७७, पुणे ४४३, सातारा ६४३, सांगली ४८१, कोल्हापूर ४३४, औरंगाबाद ३७४, जालना २०३, बीड ६५९, लातूर २८५, उस्मानाबाद ४१६, नांदेड ५२९, परभणी १९२, हिंगोली ३६०, बुलढाणा ४८३, अकोला ११९, अमरावती ३८३, यवतमाळ २०६, वर्धा २२६, नागपूर २६६, भंडारा १७८, गोंदिया २११, व चंद्रपूर २१६ एवढा आहे.

तक्त्यामध्ये दर्शविल्याप्रमाणे महाराष्ट्र एकूण उपचारासाठीचे प्रस्तावीत क्षेत्र ४२०९७७४ हेक्टर आहे. त्यामध्ये ठाणे ५६४०६, रायगड ७१९३०, रत्नागिरी १९०१५२, सिंधुदुर्ग ६५४३४, नाशिक ९०१३१, धुळे ८५९१४, नंदुरबार ७६५३४, जळगाव १२६४४८, अहमदनगर ६५४३४, पुणे १३५१०४, सातारा २५६८१८, सांगली ११९७३४, कोल्हापूर १४००९८, औरंगाबाद ११०३२४, जालना १२८०६८, बीड २३१०३०, लातूर १०७१३२, उस्मानाबाद १६८५५२, नांदेड २१९७०७, परभणी ८५९३९, हिंगोली १२६२८५, बुलढाणा १४९९८४, अकोला ५२०५४, अमरावती ११४१०, यवतमाळ ६४७७१, वर्धा ४६३४७, नागपूर ९०२७३, भंडारा ४३८२७, गोंदिया ३४७०९, व चंद्रपूर ३७०५ हेक्टर असे आहे.

महाराष्ट्र राज्यातील एकूण प्रकल्प मूल्य ४४७३०१.३४ लाख रुपये आहे. त्यामध्ये सर्वात जास्त सातारा जिल्ह्याचे ३१२०२.१६ लाख रुपये आहे. ते राज्याच्या एकूण खर्चाच्या ७.६४ टक्के एवढे आहे. तर सर्वात कमी वाशिम जिल्ह्याचे ३४०१.८२ एवढे आहे. ते राज्याच्या एकूण खर्चाच्या (०.०७ टक्के) एवढे आहेत. तर ठाणे ७१२८.७८ (१.५९ टक्के), रायगड १०७८९.५ (२.४१ टक्के), रत्नागिरी २७९०८.७५ (६.२३ टक्के), सिंधुदुर्ग ११६७७.५२ (२.६१ टक्के), जळगाव १५१७३.७२ (३.३९), अहमदनगर ७४५२.०३ (१.६६ टक्के), सांगली १४३६८.१२ (३.२१ टक्के), कोल्हापूर २१०१४.७५ (४.६९ टक्के), औरंगाबाद १३१३८.९३ (२.९३ टक्के), जालना १५३६८.२१ (३.४३ टक्के), बीड २७७२३.६७ (६.१९ टक्के), लातूर १२८५५.९७ (२.८७ टक्के), उस्मानाबाद २०२२६.२६ (४.५२ टक्के), नांदेड २६३६४.८५ (५.५९ टक्के), परभणी १०३१२.७१ (२.३० टक्के), हिंगोली १५१५५.३४ (३.३८ टक्के), बुलढाणा १७९९८.१२ (४.०२ टक्के), यवतमाळ ६४६३.१७ (१.४४ टक्के), वर्धा ५५६१.६२ (१.२४ टक्के), नागपूर १०८३२.७६ (२.४२ टक्के), भंडारा ५२५९.२७ (१.१७ टक्के), गोंदिया ४१६५.०३ (०.९३), चंद्रपूर ४४४६.२२ लाख रपये (०.९९ टक्के) आहे.

**संदर्भ सूची :**


- माधव चितळे (२०१०): महाराष्ट्र सिंचन सहयोग, सिंचन क्षेत्राच्या भावी विस्तारीत कक्षा, प्रिंटवेल इंटरनॅशनल, औरंगाबाद.
- रामचंद्र मोरवंचीकर-पाणी टंचाईवर उपाय अमृत धारा, जलसाक्षरता २००६, धाराप्रिंटर प्रा.लि., मुंबई.
- घारे, श्री. मुकूंद (२०००): सहभागी पाणलोटक्षेत्र विकास हस्तग्रंथ सहभागीय नियोजन-अफॉर्म प्रकाशन, नाशिक
- सुर्यवंशी, अरूण (२००३): भूजलपुनर्भरण पध्दती, साकेत प्रकाशन औरंगाबाद
- मृद्रा संधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन विभाग, महाराष्ट्र शासन
- मुसांडे, प्रा.देशमुख, प्रा.वराडे (२०००): पाणलोट क्षेत्रात पीक नियोजन, साकेत प्रकाशन, औरंगाबाद.
- पांडव, रमेश (२०१०): जिरायत शेती, सिंचन साधना, प्रिंटवेल इंटरनॅशनल प्रा.लि. औरंगाबाद.
- जिल्हा कृषी अधिक्षक कार्यालय, बीड.